फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९५२० / २२९२९४

Phone : (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229520 / 229294

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

*Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded*

संदर्भः—परीक्षा/व्यावसायिक अभ्यासक्रम/2015—16/3942 दिनांकः 15.01.2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
(बी.एड्./बी.एड्.—एम.आर व एच.आय./बी.लीब./बी.जे/बी.एफ्.ए./बी.फार्मसी/
एम.लीब./एम्.जे./एम.फार्मसी/एम.एड्./एम.एफ्.ए अभ्यासक्रम)
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : उन्हाळी—2016 परीक्षेसाठी आवेदन पत्र सादर करणेबाबत.

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशीत व अनुत्तीर्ण परीक्षार्थीकरिता नवीन व जुन्या अभ्यासक्रमांसाठी उन्हाळी—2016 चे परीक्षा आवेदन पत्र हे ऑफलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्कासह खालील तकत्यात दर्शविलेल्या तारखांप्रमाणे परीक्षा विभागास सादर करण्यात यावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदन पत्रातील सर्व माहिती उदा. विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव, परीक्षेचे सर्व विषय/मेथड/ईलेक्टीव्हस् अचूक लिहिले किंवा नाही हे महाविद्यालयांनी तपासूनच परीक्षा आवेदन पत्र सादर करावेत. परीक्षार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र इंग्रजी अद्याक्षराप्रमाणेच त्यांच्या गुणपत्रिकेवरील आसन क्रमांकानुसारच सादर करावेत. सोबत वर्गनिहाय विद्यार्थ्याच्या नावाची सवीस्तर यादी, स्टेटमेंट ए.,बी.,सी.,डी. व सी. डी.सह सादर करावी, अन्यथा परीक्षा आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत. वरीलपैकी ज्या अभ्यासक्रमांचे हिवाळी 2015 चे निकाल जाहीर झालेले नाहीत लागले नाहीत त्या अभ्यासक्रमांसाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याची तारीख स्वतंत्रपणे दर्शविण्यात येईल.

नवीन व जुन्या अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात यावेत. यु.जी. व पी.जी. साठी स्वतंत्र प्रस्तावासोबतच स्वतंत्र परीक्षा शुल्काची रक्कम अथवा डी.डी. असावा. यु.जी. आणि पी.जी. साठी एकत्रित प्रस्ताव किंवा एकच डी.डी. तयार करण्यात येऊ नये. तसेच, वार्षिक व सत्र पध्दतीसाठीही स्वतंत्र प्रस्ताव असावेत. महाविद्यालयांनी नियोजित तारखेचा धनाकर्ष नसल्यास व नियोजित तारीखेस परीक्षा आवेदन पत्र परीक्षा विभागात सादर न केल्यास महाविद्यालयास नियमानुसार विलंब शुल्क आकाराण्यात येईल. कळावे.

आपला,

**परीक्षा नियंत्रक**

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## उन्हाळी–2016 परीक्षेकरिता आवेदन पत्र सादर करण्यासाठी

## परीक्षा शुल्क व दिनांकबाबत सविस्तर माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | महाविद्यालयांनी विद्यार्थ्याकडून विहित परीक्षा शुल्कासह परीक्षा आवेदन पत्र स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक व परीक्षा शुल्क (परीक्षा आवेदनपत्र शुल्क स्वतत्र राहील) | परीक्षा शुल्काचा धनाकर्ष (Demand Draft) काढण्याचा दिनांक | महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे परीक्षा आवेदन पत्र सादर करावयाचा शेवटचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | **बी. एड्.**<br>बी.एड्.–एम.आर.<br>बी.एड्.–एच.आय. | रु. 560 सर्व पेपरर्ससाठी समान, प्रात्यक्षिक रु. 190, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 27.01.2016 (नांदेड जिल्हा)<br>28.01.2016 (परभणी / हिंगोली<br>29.01.2016 (लातूर जिल्हा) |
| 2. | **एम. एड्.**<br>वाषिक व सत्र पध्दतीसाठी | रु. 735, सर्व पेपरर्ससाठी समान, अहवाल शुल्क / प्रात्यक्षिक शुल्क रु. 190, किमान शुल्क रु. 195, 2 पेपर्सपर्यंत,पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 27.01.2016 (नांदेड जिल्हा)<br>28.0.2016 (परभणी / हिंगोली<br>29.01.2016 (लातूर जिल्हा) |
| 3. | **बी. लिब.** | रु. 455, सर्व पेपरर्ससाठी समान, प्रात्यक्षिक रु. 190, किमान शुल्क रु. 195, 2 पेपर्सपर्यंत, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 27.01.2016 |
| 4. | **बी. जे.** | रु. 455, सर्व पेपरर्ससाठी समान, प्रात्यक्षिक रु. 190, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 28.01.2016 |
| 5. | **बी. एफ. ए.** | रु. 360, सर्व पेपरर्ससाठी समान, प्रात्यक्षिक रु. 365, किमान शुल्क रु. 195, 3 पेपर्सपर्यंत, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 29.01.2016 |
| 6. | **एम. एफ. ए.** | रु. 735, सर्व पेपरर्ससाठी समान, प्रात्यक्षिक रु. 365, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 29.01.2016 |
| 7. | **बी.फार्मसी.**<br>वार्षिक व सत्र पध्दतींसाठी | रु. 595 सर्व पेपरर्ससाठी समान, प्रात्यक्षिक रु. 190, किमान शुल्क रु. 195, 3 पेपर्सपर्यंत, पर्यावरण अंतिम वर्ष रु. 75, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 30.01.2016 |
| 8 | **एम. लिब.** | रु. 345, सर्व पेपरर्ससाठी समान, अंतर्गत शुल्क – रु. 60, प्रात्यक्षिक रु. 105, प्रकल्प शुल्क – रु. 25, किमान शुल्क रु. 195, 2 पेपर्सपर्यंत, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 27.01.2016 |
| 9. | **एम. जे.**<br>नवीन व जुना अभ्यासक्रम | रु. 455, सर्व पेपरर्ससाठी समान, अंतर्गत शुल्क – रु. 60, प्रात्यक्षिक रु. 105, प्रकल्प शुल्क – रु. 300, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 28.01.2016 |
| 10. | **एम.फार्मसी**<br>सी.जी.पी.ए. व सी.बी.सी.एस सत्र पध्दतीसाठी | परीक्षा शुल्क – रु. 1305 / –, पासिंग प्रमाणपत्र रु. 75; अंतिम वर्षासाठी, दि. 23.01.2016 | 25.01.2016 | 30.01.2016 |

परीक्षा नियंत्रक

सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ; यांना,
विलंब परीक्षा शुल्क आवेदनपत्र योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

मा. परीक्षा मंडळ निर्णय क्र. 09/2014, दि.18.02.2014 चा ठराव :–

परीक्षा आवेदनपत्र भरण्याची जी तारीख आहे त्या तारखेपासून 20 दिवसापर्यंत विलंबाने आलेले परीक्षा फॉर्म स्विकारण्यात यावेत, त्यासाठी परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत संपल्यानंतर पहिल्या 10 दिवसांपर्यंत रु. 1,000/– व 10 दिवसांच्यानंतर 20 दिवसांपर्यंत आलेल्या विलंब अर्जासाठी रु. 2,000/– दंड आकारुन फॉर्म स्विकारण्यात यावा, परंतु 20 दिवसांच्यानंतर कोणत्याही स्थितीत विलंब परीक्षा अर्ज स्विकारण्यात येऊ नयेत.

टीप :– बी. पी. एड्. व एम. पी. एड्. या अभ्यासक्रमांसाठी चालू शैक्षणिक वर्षाचा नवीन अभ्यासक्रम हा संबंधित विभागाडून निर्गमीत झाल्यानंतर उन्हाळी 2016 परीक्षेचा कार्यक्रम विद्यापीठ संकेत  स्थळावर जाहीर करण्यात येईल.